# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - १२

## (सभावृत्तांत)

दिनांक–०७/०६/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार,दिनांक ०७/०६/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ऊंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.मुंढे उषा अंकुश
५) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
७) मा.कुटे निर्मला संजय
८) मा.कोमल दिपक मेवानी
९) मा.आशा धायगुडे-शेंडगे
१०) मा.गोफणे अनुराधा देविदास
११) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१२) मा.राजू मिसाळ
१३) मा.अमित राजेंद्र गावडे
१४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.लांडे-मुख्यलेखापाल,मा.पाटील,मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे,मा.खोसे,मा.दंडवते,मा.कडूसकर,मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.आष्टीकर,मा.बोदडे,मा.खोत-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम,मा.इंगळे, मा.तांबे,मा.चव्हाण,मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.गलबले, मा.घोडे,मा.कांबळे, मा.ओंभासे,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले,मा.मोरे,मा.पाटील,मा.घुबे-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.मुंढे-सहा.प्रशा.अधिकारी (शिक्षणमंडळ),मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी,मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

नवनियुक्त महापालिका अतिरिक्त आयुक्त श्री.अच्युत हांगे यांचे स्थायी समितीच्या वतीने मा.सभापती यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. आणि त्यानंतर मा.अति.आयुक्त यांनी त्यांचा मा.सभागृहास परिचय करुन दिला.

तसेच नेत्रदानाबाबत जनजागृती करुन लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी शहरात कार्य करणारे श्री.पराग कुंकूलोळ, श्री.राम फुगे (जागृती सोशल फाऊंडेशन) आणि श्री.सतिश नवले (प्रेरणा असोसिएशन फॉर द ब्लाईण्ड) यांचा मा.सभापती सौ.सिमा सावळे आणि मा.आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

---------

**निर्णय-**मा.दंडवते साहेब, यांनी महापालिकेने ठेका दिलेल्या संस्थांमध्ये काम करणा-या कंत्राटी कर्मचा-यांच्या आय-कार्डची झेरॉक्स कॉपी, त्यांचा पी.एफ. आणि ई.एस.आय. क्रमांक द्यावा. या कर्मचा-यांची सर्व माहिती एकत्रित करुन सादर करावी. जे ठेकेदार कामगारांचा ई.एस.आय. आणि पी.एफ. भरत नसल्याचे आढळून आले आहे, त्यांच्यावर या आठवडयामध्ये फौजदारी दाखल करण्यात यावी. सत्वर कार्यवाही करणेत यावी.

---------

ठराव क्रमांक –४७० विषय क्रमांक – १
दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – उद्यान
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भः- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/४१३/२०१७ दि.६/५/२०१७
विषय- स्व.राजेश बहल उद्यान देखभाल व संरक्षण करणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४७१ विषय क्रमांक – २
दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – उद्यान
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भः- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/४०४/२०१७ दि.६/५/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.०३/२६/२०१६-१७ अन्वये कै.हरीभाऊ दिनाजी वाघेरे उद्यान देखभाल व संरक्षण करणेकामी मे.जी.बी.इंटरप्रायजेस निविदा रक्कम रुपये ९,७०,५६०/- (अक्षरी र.रू.नऊ लाख सत्तर हजार पाचशे साठ फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा पेक्षा ७.००% कमी दराने स्विकृत करून कामाचा आदेश निर्गत करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४७२ विषय क्रमांक – ३

दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – लेखा

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/२४२/२०१७ दि.१८/५/२०१७

विषय - सन २०१५-१६ मधिल उर्वरित संचलनतूट रक्कम अदा करणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय-** पीसीएमटी आणि पीएमटी यांचे एकत्रिकरण होवून कंपनी स्थापन झाल्यानंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून पीएमपीएमएल यांना पासेस,कर्मचारी पगार,बसखरेदी इ. कारणांसाठी वेळोवेळी निधी उपलब्ध करुन दिला जातो. पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी एकदातरी शहरात येवून येथील स्थानिक समस्या, नगरसेवकांचे म्हणणे ऐकून घ्यावे. पीएमपीएमएल संस्थेस पैसे देण्यास विरोध नाही. परंतू स्थायी समितीने त्यांना पत्र देऊन १५ दिवस उलटले तरी त्यांचेकडून उत्तर आलेले नाही.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४७३ विषय क्रमांक – ४

दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/४८/२०१७ दि.१९/५/२०१७

विषय– सायन्स पार्क भेटीच्या देय बीलाबाबत तसेच पिंपरी चिंचवड विज्ञान केंद्रास भेटीकामी पुरविणेत आलेल्या प्रासंगिक करारावरील बिलाबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४७४ विषय क्रमांक – ५

दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – क्रीडा

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/२५५/२०१७, दि.२०/०४/२०१७

विषय – कासारवाडी जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाजाबाबत...

विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय-** मागितलेली सर्व माहिती या आठवड्यात देण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४७५ विषय क्रमांक – ६

दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – दक्षता व नियंत्रण कक्ष

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.दवनि/कावि/२/८३/२०१७ दि.२२/५/२०१७

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगवी स्मशानभूमीत पर्यावरणपूरक गॅस

शवदाहिनी बसविणेच्या कामाचा आर्थिक व तांत्रिक सल्ला अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचेकडून घेणेबाबत...

विषय क्रमांक ६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय- १)** ठेकेदाराबरोबर केलेल्या करारनाम्यात ज्या काही अटी-शर्ती टाकलेल्या असतील, त्यानुसार वर्षभरात काही त्रुटी निर्माण झाल्यास त्या दूर करण्यासाठी ठेकेदाराकडून काम करुन घेणे ही त्या विभागप्रमुखांची जबाबदारी आहे. नागरीकांच्या सोयीसाठी ही सुविधा केली असताना मात्र गैरसोय होताना दिसते आहे. ह्या त्रुटी दूर कराव्यात.

**२)** गॅस शवदाहिनी अहवालात अधिका-यांनी स्वयंस्पष्ट अभिप्राय दिला आहे. प्रशासनाने त्याचा पूर्णपणे अभ्यास करुन पूर्ण पार्श्वभूमी समजून घ्यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४७६ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – स्थापत्य BSUP प्रकल्प

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/ BSUPप्र/१९५/२०१७ दि.२२/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

मे.सोल स्पेस, श्री.शशांक फडके यांची पंतप्रधान आवास योजनेतील प्रकल्पांसाठी आर्किटेक्ट सेवेसाठी DPR Cost च्या ०.९०% व Infra साठी निविदा रकमेच्या ०.९०% प्रकल्प खर्चावर फी देणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार या सेवेसाठी प्रत्यक्ष प्रकल्प खर्चाच्या १.४५% फी असे एकुण २.३५% फी देवून त्यांची नेमणूक करणे तसेच मे. Gensys Technologies Pvt. Ltd. यांची निविदा पश्चात प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) करिता प्रत्यक्ष प्रकल्प खर्चाच्या १.४५% फी देवून त्यांची नेमणूक करून करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पंतप्रधान आवास योजनेतील प्रकल्पांसाठी मे.सोल स्पेस, श्री.शशांक फडके यांचेबरोबर मे.पी.के.दास अँड असोसिएटस्, मुंबई यांचीही आर्किटेक्ट सेवेसाठी DPR कॉस्टच्या ०.९०% व इन्फ्रासाठी निविदा रकमेच्या ०.९०% प्रकल्प खर्चावर फी देवून व करारनामा करुन नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४७७ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – स्थापत्य क क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कक्षे/कावि/५५०/२०१७ दि.२६/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्र.३७ मधील टेल्को रोड पासून इंद्रायणीनगर चौक ते डिस्ट्रिक्ट पर्यंतचा रस्ता रुंदीकरण करुन विकसित करणेकामी मनपाच्या सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये तरतुद प्रस्तावित करणेत आलेली आहे. सदर कामाची व्याप्ती मोठी असल्याने या रस्त्या करिता मे.पेव्हटेक कंन्स्लटंट यांची सल्लागार म्हणून मनपाच्या प्रचलित दरानुसार म्हणजेच १) निविदापूर्व कामासाठी देणेत येणारी फी र.रु. =०.९० % x स्विकृत निविदा रक्कम तसेच

२) निविदा पश्चात कामासाठी देणेत येणारी फी र.रु. =१.४५ % X स्विकृत निविदा रक्कम अधिक सेवाकर इ.मनपाच्या नियमानुसार देवून नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४७८ विषय क्रमांक – ९
दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – झोनिपु स्थापत्य
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/१४५/२०१७ दि.२४/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. २/१२-२०१६-१७ मधील अ.क्र. ०३ अन्वये प्रभाग क्र.८ दत्तनगर झोपडपट्‌टीमध्ये जुने VDO Center येथे जुने संडास ब्लॉक पाडून २६ सिट्सचे शौचालय बांधणेकामी मे.श्री कंन्स्ट्रक्शन, शैलेंद्र शिवाजी फाळके नि.र.रु.३२,६७,५०६/- (अक्षरी र.रु.बत्तीस लाख सडूसष्ठ हजार पाचशे सहा फक्त) पेक्षा ११.९६% कमी या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.२८,७६,७१२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय**–स्वच्छ भारत योजनेअंतर्गत शहर ओ.डी.एफ. मुक्त करण्याचा संकल्प असताना शौचालय बांधणेचे कामात मुदतवाढ देण्यात येणार नाही. दिलेल्या कालावधीत काम पूर्ण झाले पाहिजे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४७९ विषय क्रमांक – १०
दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – नागरवस्ती विकास योजना
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/०४/कावि/५६४/२०१७ दि.३१/५/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नागरवस्ती विकास योजना विभागाअंतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. महापालिकेच्या नि:समर्थ (अपंग) कल्याणकारी योजना क्र.६ अन्वये मनपा हद्दीतील अपंग व्यक्तिंना व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणेबाबत सन-२०१६-१७ मध्ये जाहिर प्रकटनानुसार अर्ज मागविले असुन प्राप्त अर्जापैकी एक लाभार्थिचे कर्ज प्रकरण बँकेने मंजुर केले आहे. त्यानुसार श्री.विजय अरविंद शिंगे यांना एकुण र.रू.१,००,०००/- (अक्षरी र.रू. एक लाख फक्त) (Back end Subsidy) स्वरूपात अर्थसहाय्य देण्यास व त्याकरिता येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४८०　　　　　　　　　विषय क्रमांक – ११
दिनांक – ०७/०६/२०१७　　　　　　　　　विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी　　　　　　　　अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/२ब/कावि/५५/२०१७ दि.३१/५/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ३) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४८१　　　　　　　　　विषय क्रमांक – १२
दिनांक – ०७/०६/२०१७　　　　　　　　　विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.निर्मला कुटे　　　　　　　　　अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/१४/कावि/९९/२०१७ दि.१/६/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

Vision India Pavillion at the World Build-India 2017 on 20th to 22nd April 2017, at Bombay Exhibition & Convention centre, Mumbai येथे प्रदर्शनास भाग घेणेकामी खर्च र.रू.२६,१७९/- (अक्षरी र.रू.सव्वीस हजार एकशे एकोणऐंशी फक्त) व त्यासाठी आगाऊ अदा केलेल्या र.रू.५०,०००/-चे समायोजन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४८२　　　　　　　　　विषय क्रमांक – १३
दिनांक – ०७/०६/२०१७　　　　　　　　　विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे　　　　　　अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/७४३/२०१७ दि.०१/०६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ई-निविदा प्रणालीसाठी Digital Signature New Key पुरवठा व नुतणीकरण करणेकामी उत्पादित कंपनीचे Digital Signature Key खरेदीकामी व नुतणीकरण करणेकामी ऑनलाईन निविदा क्र.५३/२०१६-१७ अन्वये प्रसिध्द करून ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन निविदा दर प्राप्त झाले आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.साई असोसिएटस,नाशिक यांचे बाब क्र.१ व २ साठी र.रु.१८,१९,०००/- (अक्षरी र.रू. अठरा लाख एकोणीस हजार फक्त) लघुत्तमदर प्राप्त झाले आहेत. मनपाच्या ई-निविदा प्रणालीसाठी Digital Signature New Key पुरवठाकरणे व नुतणीकरण करणेकामी n(code) solution या उत्पादित कंपनीकडील Digital Signature New Key व नुतणीकरण करणे

आवश्यक आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ४६.४७% ने कमी आहे. सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४८३ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२४९/२०१७ दि.३०/५/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या निविदा क्र.८/२/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.7 च-होली येथील जुनी वापरात नसलेली टाकी पाडणे व इतर दुरूस्ती विषयक कामे करणेकामी मे.जयगणेश एंटरप्रायझेस निविदा रक्कम रू.४,१८,५९९/- (अक्षरी र.रू.चार लाख अठरा हजार पाचशे नव्व्यान्नव फक्त) पेक्षा ४.४०% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.४,२०,१९०/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४८४ विषय क्रमांक – १५

दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.आशा शेंडगे-धायगुडे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/०६/कावि/४३२/२०१७ दि.३१/५/२०१७

मा.सहा.आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

सन २०१७-१८ चा वित्तीय वर्षात इ.१० वी व १२ वी मधील ८५% पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या १२७ पात्र विद्यार्थ्यांना लाभ देणेकामी र.रू.१५,४५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये पंधरा लाख पंच्चेचाळीस हजार फक्त) चे खर्चास तसेच अपात्र अर्जापैकी कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर पात्र ठरणा-या अर्जदार विद्यार्थ्यांना लाभ देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच इ.१० वी मध्ये ८०% ते ९०% गुण प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांना रु.१०,०००/- व ९०% पेक्षा जास्त गुण प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांना रु.१५,०००/- तसेच इ.१२ वी मध्ये ८०% पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विद्यार्थ्यांना रु.१५,०००/- मनपामार्फत बक्षिस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४८५ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/२०६/२०१७ दि.०२/०६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५७/२/१६-१७ अन्वये प्रभाग क्र.४३ मधील स्मशानभुमीचे उर्वरीत स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.एच.सी.कटारीया नि.र.रु.७०,०१,३१५/- (अक्षरी र.रु.सत्तर लाख एक हजार तीनशे पंधरा फक्त) पेक्षा ८.६०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.६७,१९,१६२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्क्म अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४८६ विषय क्रमांक – १७
दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/इमु/कावि/२०७/२०१७ दि.०२/०६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६१/१/१६-१७ प्रभाग क्र.३५ मध्ये स.नं.१ मध्ये वाचनालयासाठी बैठक व्यवस्था करणे व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे. इंदरदिप कन्स्ट्रक्शन कं. नि.र.रु.१,८६,७३,६१२/- (अक्षरी र.रु.एक कोटी शहाऐंशी लाख त्र्याहत्तर हजार सहाशे बारा फक्त) पेक्षा ०.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१,९४,१३,१८०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्क्म अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४८७ विषय क्रमांक – १८
दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/२५०/२०१६ दि.१७/१०/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/१९/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.२५ चिंचवड स्टेशन (आनंदनगर) परिसरातील पेव्हिंग ब्लॉक बसविणे व अनुषंगिक कामे करणेकामी

M/s. VYANKATESHWARA CONSTRUCTION नि.र.रू.२३,२४,६१३/- (अक्षरी र.रू.तेवीस लाख चोवीस हजार सहाशे तेरा फक्त) पेक्षा ८.१०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२२,४३,१३५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४८८ विषय क्रमांक – १९
दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – नागरवस्ती विकास योजना
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/०४/कावि/५७०/२०१७ दि.१/६/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निःसमर्थ(अपंग) कल्याणकारी योजना क्र.७ अन्वये मनपा क्षेत्रातील ० वर्षापुढील मतिमंद व्यक्तीचा सांभाळ करणा-या पालकांना व मनपा हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस सहामाही अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत १२० पात्र लाभार्थींना प्रत्येकी सहामाही रक्कम रू.१२,०००/-(अक्षरी र.रू.बारा हजार फक्त) अर्थसहाय्य अदा करणे व माहे- ऑक्टों-२०१६ ते मार्च- २०१७ अखेर प्राप्त होणा-या अर्जदारांपैकी पात्र अर्जदारांना प्रत्येकी रक्कम रू.१२,०००/- (अक्षरी र.रू बारा हजार फक्त) प्रमाणे एकुण र.रू.१४,४०,०००/- (अक्षरी र.रुपये चौदा लाख चाळीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४८९ विषय क्रमांक – २०
दिनांक – ०७/०६/२०१७ विभाग – क्रीडा
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/३३५/२०१७, दि.२०/०५/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.क्रिडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ११ दिनांक २६/०५/२०१७ नुसार मा.अतिरिक्त आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७अ/कावि/३२१/२०१७, दि.१५/०५/२०१७ अन्वये मे.वरदायिनी एन्टरप्रायजेस, चिंचवड १९ यांना यमुनानगर जलतरण तलाव पाणी शुद्धिकरण,परिसर स्वच्छता,साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाज,त्यांनी यापूर्वी केलेल्या करारनाम्याप्रमाणे, पुन्हा करारनामा करून पहिल्या वर्षाचे मंजूर दराने दरमहा र.रु.९७,०२०/- या दराने दिनांक ०९/०४/२०१६ ते दिनांक ०८/०४/२०१७ या १ वर्षे कालावधीचे कामाचे आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४९०
विषय क्रमांक – २१
दिनांक – ०७/०६/२०१७
विभाग - क्रीडा
सूचक – मा.निर्मला कुटे
अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.सावा/२/कावि/५९५/२०१७, दि.२५/५/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १२ दिनांक २६/०५/२०१७ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हुतात्मा चापेकर सार्वजनिक वाचनालय व श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय या दोन्ही वाचनालयांना महाराष्ट्र शासनाचा ब दर्जा प्राप्त असून त्यांना शासनाचे अनुदान मिळते. शासनाचे अनुदान मिळणेकरिता सदर सार्वजनिक वाचनालयाकरिता पुस्तक खरेदी करणेकामी सार्वजनिक वाचनालयाकडील कोटेशन क्र.२ जा.क्र.सावा/१/कावि/५/२०१७,दिनांक-०६/०१/२०१७ अन्वये प्रसिध्द करुन दरपत्रक मागविणेत आले होते. त्यामध्ये प्राप्त झालेल्या सेल्फ हेल्प पब्लिकेशन यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दराप्रमाणे हुतात्मा चापेकर सार्वजनिक वाचनालय व श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालयाकरिता पुस्तकाचे छापिल किंमतीवर २३% सुट देवून अंदाजे र.रु.१,५५,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख पंचावन्न हजार फक्त) ची पुस्तके खरेदीचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४९१
विषय क्रमांक – २२
दिनांक – ०७/०६/२०१७
सूचक – मा.राजू मिसाळ
अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव-

मा.क्रिडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १३ दिनांक २६/०५/२०१७

नुसार मनपाची छत्रपती शाहु व्यायामशाळा, प्रेमलोक पार्क ही व्यायामशाळा चंद्रकांत मित्र मंडळ, दळवीनगर या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४९२
विषय क्रमांक – २३
दिनांक – ०७/०६/२०१७
सूचक – मा.कैलास बारणे
अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.अंबरनाथ कांबळे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव -

मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १५ दिनांक २६/०५/२०१७

नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची तानाजी गावडे व्यायामशाळा, प्रभाग क्र.१८ ही सरदार गावडे प्रतिष्ठान या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४९३ विषय क्रमांक – २४

दिनांक – ०७/०६/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.बाळासाहेब ओव्हाळ,मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव -

विषय - संत तुकारामनगर येथील संत तुकाराम महाराज पुतळया मागील महानगरपालिकेची व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत...

विषय क्रमांक २४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/४५/२०१७
दिनांक - १७/०६/२०१७

,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.